सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, परिपत्रक क्रमांक दिव्यांग-२०२५/ प्र.क्र.२०/ कार्यासन-१, दि.३०/१०/२०२५

**विषय :-** शासकीय / निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था/महामंडळे/स्वायत संस्था इत्यादींच्या सेवेदरम्यान दिव्यांगत्व प्राप्त झालेल्या कर्मचा-यांसाठी अ धिसंख्य पद निर्माण करण्यासांठीच्या मार्गदर्शक सूचना.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, परिपत्रक क्रमांक दिव्यांग-२०२५/ प्र.क्र.२०/ कार्यासन -१,दि.३०/१०/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५१०३०१६४८५८११३५ असा आहे.

२. तरी, सदर शासन आदेशानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
PRAVIN MADHUKAR SHIKHARE
Date: 31-10-2025 16:21:11

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था/ नियोजन व समन्वय/आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**शासकीय/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था/ महामंडळे/ स्वायत्त संस्था इत्यादींच्या सेवेदरम्यान दिव्यांगत्व प्राप्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी अधिसंख्य पद निर्माण करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
**दिव्यांग कल्याण विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : दिव्यांग-२०२५ / प्र. क्र. २० / कार्यासन- १**
**३१ / ३२ / ३५ "ए" विंग, मित्तल टॉवर,**
**बॅरिस्टर रजनी पटेल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई- ४०००२१.**
दिनांक : ३० ऑक्टोबर, २०२५.

**वाचा :** दिव्यांग व्यक्तींचे हक्क अधिनियम, २०१६ (कलम २०)

**प्रस्तावना :-**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ हा हक्क आधारित अधिनियम आहे. हा अधिनियम दिव्यांग व्यक्तींना समान संधी प्रदान करुन भेदभावरहित वागणूक देण्यास कटीबध्द आहे आणि समाजात त्यांचा सर्वसमावेशक विकास व्हावा यासाठी कायदेशीर आधार उपलब्ध करून देतो.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम २० हे रोजगारातील दिव्यांग व्यक्तींविषयी भेदभाव न करण्यासंदर्भात आहे. तसेच कलम २०(२) अन्वये प्रत्येक शासकीय आस्थापनाने दिव्यांग कर्मचाऱ्यांना पर्याप्त सुविधा (Reasonable accommodation) तसेच अडथळामुक्त आणि अनुकूल वातावरण उपलब्ध करून द्यावे असे नमुद केले आहे. त्याचप्रमाणे कलम २०(४) अन्वये सेवेदरम्यान दिव्यांगत्व प्राप्त झालेल्या कर्मचाऱ्यांना संरक्षण प्रदान केले असून त्याचे पालन करणे हे कायदेशीररित्या बंधनकारक आहे.

याअनुषंगाने विविध विभागांकडून सेवेदरम्यान दिव्यांगत्व प्राप्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे अधिसंख्य पद निर्माण करण्यासाठी दिव्यांग कल्याण विभागाकडे मार्गदर्शन मागविण्यात येत आहे. यास्तव दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम २०(४) नुसार मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम २०(४) चा उद्देश शासकीय/ निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/महामंडळे/ स्वायत्त संस्था इत्यादींच्या सेवेदरम्यान दिव्यांगत्व प्राप्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सन्मान आणि नोकरीची सुरक्षितता प्राप्त करून देणे असा आहे. या कलमान्वये सेवेदरम्यान दिव्यांगत्व प्राप्त झालेल्या कर्मचाऱ्याला,

अ) फक्त दिव्यांगत्व प्राप्त झाले म्हणून सेवेतून काढता येणार नाही किंवा त्याच्या पदाचा दर्जा कमी करता येणार नाही.

ब) जर कर्मचारी सध्याच्या पदासाठी आवश्यक पात्रता प्राप्त करण्यास असमर्थ असेल, तर त्याला समान वेतनश्रेणी आणि लाभांसह दुसऱ्या पदावर पदस्थापना करणे आवश्यक राहील.

क) जर कर्मचाऱ्याचे कोणत्याच पदावर समायोजन करणे शक्य नसेल, तर तो योग्य पद मिळेपर्यंत किंवा सेवानिवृत्त होईपर्यंत (यापैकी जे आधी घडेल ते) त्या कालावधीसाठी अधिसंख्य (सुपरन्यूमररी) पद निर्माण करुन पदस्थापना करणे आवश्यक राहील.

२. अधिसंख्य पदांची निर्मिती करताना संबंधित विभागाने दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ३३ अन्वये दिव्यांगांसाठी केलेल्या पद सुनिश्चितीचा आधार घेण्यात यावा.

३. उपरोक्त सर्व गोष्टींची पूर्तता होते का नाही यांची खात्री केल्यानंतर जर अधिसंख्य पदे निर्माण करण्याची आवश्यकता निर्माण झालीच तर, त्यास प्रशासकीय (सामान्य प्रशासन विभाग) आणि अर्थसंकल्पीय (वित्त विभाग) मंजुरी आवश्यक असेल.

४. तथापि सेवेदरम्यान दिव्यांगत्व प्राप्त झालेला कर्मचारी सध्याच्या पदावर समायोजन केल्यास कार्यरत राहू शकतो अथवा त्याला दुसऱ्या पदावर पदस्थापना द्यावी लागेल, याबाबत संबंधित नियुक्ती प्राधिकारी हे वैद्यकीय मंडळ/ दिव्यांग तज्ञांच्या मार्गदर्शनाने किंवा आवश्यक त्या पद्धतीने मुल्यांकन करुन याबाबत आवश्यक योग्य निर्णय घेतील. यामध्ये सध्याचे किंवा नवीन मिळणारे पद त्याच्या क्षमतेशी सुसंगत आहे किंवा कसे याची खात्री करणे गरजेचे राहील.

५. प्रत्येक मंत्रालयीन विभागांनी सोबत जोडलेल्या **"परिशिष्ट-अ"** प्रमाणे माहिती दरवर्षी १ जानेवारी रोजी संबंधित विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

६. सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी सोबत जोडलेल्या **"परिशिष्ट - अ"** प्रमाणे माहिती आयुक्त दिव्यांग कल्याण, पुणे यांना प्रत्येक वर्षी १ जानेवारी रोजी उपलब्ध करुन द्यावी व त्याची एक प्रत या विभागास उपलब्ध करुन द्यावी.

७. आयुक्त दिव्यांग कल्याण, पुणे हे दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ८३ अन्वये तयार करण्यात येणाऱ्या वार्षिक अहवालात सर्व विभागांच्या **"परिशिष्ट - अ"** मध्ये प्रशासकीय विभागनिहाय दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या माहितीचा अंतर्भाव करतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५१०३०१६४८५८११३५ असा आहे. तसेच सदर शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

TUKARAM H MUNDHE

Digitally signed by TUKARAM H MUNDHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PDWD, 2.5.4.20=D60C97125DD88B1F415C73CDEF592D0F67518BBD8BA278837219A7B9D7324AEC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=57B59F48D85074D9EA4B3BACF05E19E7030E9F2B74772901E229A4BAE0497214, cn=TUKARAM H MUNDHE
Date: 2025.10.30 16:50:14 +05'30'

**( तुकाराम मुंढे )**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.,

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.,
३. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.,
४. मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.,
५. मा. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.,
६. मा. अध्यक्ष, विधानसभा, यांचे खाजगी सचिव, विधानभवन मुंबई.,
७. मा. मंत्री / राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.,
८. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/ विधानपरिषद), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.,
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.,
१०. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.,
११. सचिव, दिव्यांग कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.,
१२. विभागीय आयुक्त (सर्व).,
१३. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).,
१४. जिल्हाधिकारी (सर्व).,
१५. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१६. आयुक्त, दिव्यांग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.,
१७. मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख.,
१८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).,
१९. मुख्याधिकारी (सर्व).,
२०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मर्या.,मुंबई.
२१. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व).,
२२. प्रादेशिक दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी (सर्व).,
२३. सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व).,
२४. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
२५. तहसिलदार (सर्व).,
२६. जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).,
२७. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र सी.डी.ओ. बॅरेक नं. १ योगक्षेम समोर, वसंतराव भगवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२०.,
२८. इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय),समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२५.,
२९. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, राष्ट्रपती भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई.,
३०. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई ४०० ००१.,
३१. बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई ४०० ००१.,
३२. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमेटी, ३१४, राजभवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई.,
३३. भरतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब, मिल पॅलेस, वरळी, मुंबई.,
३४. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०० ०२८.

## परिशिष्ट "अ"

विभागाचे नाव :-

| सेवेत आल्यानंतर दिव्यांग कर्मचाऱ्यांची संख्या | अधिसंख्य पदे निर्माण न करता समायोजित दिव्यांग कर्मचाऱ्यांची संख्या | अधिसंख्य पदे निर्माण केलेल्या दिव्यांग कर्मचाऱ्यांची संख्या | नियमित वेतनाचे व सेवेचे लाभ सुरू असलेल्या दिव्यांगांची संख्या | प्रकरणे प्रलंबित असलेल्या दिव्यांगांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |